# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 11/05/2020 (सोमवार)
(दुपार)

### अवैधरीत्या विदेशी दारुची
### वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### पो. स्टे. कन्हानची कार्यवाही एकुण 10,04,705/–रू. चा मुद्देमाल जप्त

पो.स्टे. कन्हान :– दिनांक 10/05/2020 रोजी पो. स्टे. कन्हान मधील पोलीस स्टाफ हे पो. स्टे. कन्हान परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा बोरडा शिवार हायवे रोडवर एमएच–49/बीबी– 9017 क्रमांकाच्या एका हुंडाई कंपनीच्या क्रेटा गाडी मध्ये अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक होणार आहे. अशा माहिती वरून पो. स्टे. कन्हान पोलीस स्टाफने मौजा बोरडा शिवार हायवे रोडवर नाकाबंदी केली. दरम्यान मनसर कडून नागपूर हायवे कडे एक एमएच–49/बीबी– 9017 क्रमांकाची हुंडाई कंपनीची क्रेटा गाडी येतांना दिसली. सदर वाहनाला थांबवुन तपासले असता वाहनात आरोपी नामे क्र. 1) स्नेहल जगदीश विटनकर, वय 32 वर्ष, रा. प्लॉट क्र. 85, भवानीनगर पारडी, नागपूर व 2) प्रतिक महेन्द्र पटले, वय 32 वर्ष, रा. कुंतविहार बिल्डींग, लकडगंज, नागपूर यांच्या ताब्यातुन क्रेटा गाडीच्या सिट मध्ये जवळ विदेशी दारू मिळून आली. सदर गाडी मध्ये विदेशी दारू कि. 4,705/–रू., वाहन 10,00,000/–रू. असा एकुण किंमती 10,04,705/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पो. स्टे कन्हान येथे गुन्हा दाखल आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे सपोनि श्री सतिश मेश्राम, पो. स्टे. कन्हान यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ) ई महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम सहकलम 207 मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, पोलीस उप अधिक्षक कामठी विभाग श्री संजय पुज्जलवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स्टे. कन्हानचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. अरून त्रिपाठी, सहायक पोलीस निरीक्षक श्री. सतिश मेश्राम, सफौ पाली, पोलीस नायक राजेन्द्र गौतम, पोलिस शिपाई मुकेश वाघाडे, मंगेश, विरन्द्रसिंग, सुधीर, सतिश तांदडे, चालक पोशि जितु यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीला अटक, पो.स्टे कन्हानची कार्यवाही

पो.स्टे. कन्हान – फिर्यादी यांची वय 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी/पीडित हि दि. 09/05/2020 चे 10:30 वा. चे सुमारास दुकाणातुन चॉकलेट आणायला जाते असे सांगुण घरून निघुन गेली. उशिर झाला ती परत न आल्याने तिच्या नातेवाईक व मित्रमंडळी कडे तिचा शोध घेतला. दरम्यान मिळून न आल्याने फिर्यादीच्या रिपोर्ट वरून कलम 363 भादवी अन्वये पो.स्टे. नंदनवन, नागपूर शहर येथे दि. 10/05/2020 चे 09:14 वा. गुन्हा करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपी व पीडिते बाबत गुप्त बातमीदार यांच्या कडुन योग्य ती माहिती प्राप्त झाल्याने पो. स्टे. कन्हान येथील पोलीस पथकाने पो. स्टे. कन्हान हद्दीत आरोपी नामे– रवि पुंडलिक चौरे, वय 22 वर्ष, रा. पिपरी वार्ड क्र. 2, कन्हान यास ताब्यात घेतले व संबधीत पो.स्टे ला कळवुन गुन्हा उघडकीस आनले. नमुद आरोपीस पुढील कार्यवाही करीता पो.स्टे. नंदनवन, नागपूर शहर यांच्या ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, पोलीस उप अधिक्षक कामठी विभाग श्री संजय पुज्जलवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स्टे. कन्हानचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. अरून त्रिपाठी, सहायक पोलीस निरीक्षक श्री. सतिश मेश्राम, पोहवा खुशाल रामटेके, पोलीस नायक मंगेश ढबाले, राहुल रंगारी, पोलिस शिपाई संजु, मुकेश वाघाडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर  जिल्हा (ग्रामीण), नागपूर